# वारकऱ्यांमार्फत बीजारोपण प्रकल्प - एक आढावा आणि आवाहन

ठाण्यातील हरियाली या संस्थेतर्फे सबंध महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड आणि वनवृध्दी करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जातात.

या उपक्रमांचाच एक भाग म्हणून दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपुर येथे यात्रेनिमित्त राज्यभरातून पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांनी आपल्या वारीच्या मार्गालगत तसेच आपापल्या गांवी शेतांचे बांध, इतर बखळ आणि मोकळ्या जागांवर रुजविण्यासाठी वेगवेगळ्या वृक्षांच्या बीया वाटल्या जातात. या बीयांमध्ये स्थानिक परिसरात चांगल्या प्रकारे रुजून येऊ शकतील अशा करंज, नीम, शिसू, शिवण, खैर, वावळा, मोगली एरंड (जेट्रोपा) आदि सुमारे वीस एक विविध प्रजातींचा समावेश असतो. एकेका पाकिटात एकित्रत केलेल्या सुमारे शंभर शंभर बीया ठाण्यातील भगवती विद्यालय, काळसेकर महाविद्यालय आदि शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांमार्फत भरल्या जातात. त्यानंतर अशा पाकिटांचे वाटप वारीच्या मार्गावरील सासवड, जेजुरी, वाल्हे, निरा, लोणंद आदी केंद्रांवर त्या त्या ठिकाणचे विद्यार्थी / विद्यार्थिनी, शिक्षक, इतर सेवाभावी संस्था व नागरिकांतर्फे केले जाते. त्यांत सासवड येथील कन्या प्रशाळा, शिवशक्ती पतपेढी, कस्तुरबा गांधी अनाथ विद्यार्थी आश्रम, जेजुरी येथील जिजामाता विद्यालय, वाल्हे येथील वाल्मिकी विद्यालय, निरा येथील श्री. युवराज निवसे, लोणंदच्या लक्ष्मी स्टोअर्सचे श्री. पानावकर, वाघळवाडी येथील समर्थ ज्ञानपीठाची उत्कर्ष माध्यमिक आश्रमशाळा, शिरवळ येथील कृषी अधिकारी श्री. सुराडकर, त्या, त्या ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्था, श्री बाबा महाराज सातारकर आदिंचा सहभाग विशेष उल्लेखनीय राहिलेला आहे.

गेली तीन वर्षे हरियाली हा उपक्रम राबवीत असून त्यांतील लोकांचा सहभाग आणि वारकऱ्यांच्या प्रतिसादाचाआलेख सतत चढता राहिलेला आहे. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी दि. १९ ते २१ मार्च २००८ या काळात केलेल्या पाहणीत वारीच्या मार्गावर अनेक ठिकाणी करंज, शिसू, कडूनिंब, बाभूळ, सुबाभूळ, जेट्रोपा, गुलमोहोर, पीत गुलमोहोर, वावळा, शेवगा आदि वृक्षांच्या बीयांनी रुजून आलेली सुमारे दोन ते तीन वर्षाची अनेक रोपे दिसून आली. ही रोपे आता स्वयंप्रेरित झालेली आहेत. त्याचप्रमाणे त्या, त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या परिसरात त्यांतील कांही बीयांची रुजवण केलेली होती. ती रोपे देखील बघायला मिळाली. वाघळवाडी येथील उत्कर्ष माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी तर या उपक्रमावर आधारित एक विज्ञान संशोधन प्रकल्प तयार करुन तो राष्ट्रीय बाल विज्ञान संशोधन स्पर्धेत सादर केला. जिल्हा स्तरावर या प्रकपाचे उत्तम स्वागत झाले. हा प्रकल्प सादर करणाऱ्या चैतन्य आणि अजित सावंत व अमोल धोतरे या विद्यार्थ्यांनी नोंदलेल्या निष्कर्षांपैकी खालील निष्कर्षांचा प्रामुख्याने उल्लेख आणि विचार करायला हवा.

१. आकाराने लहान व बाह्य आवरण पातळ असलेल्या बीया लवकर रुजतात. उदा. हादगा, काटे बाभूल, विलायती चिंच, एरंड, ईत्यादि.

२. जुने बी लवकर / अजिबात रुजत नाही. वरुन चांगले दिसले तरी फोडून बघितल्यावर त्यांच्या आतील गाभ्यास बुरशी लागलेली आढळून आली.

३. परिसरात उगवणाऱ्या म्हणजेच चिंच, काटे बाभूळ, सुबाभूळ, एरंड, रानभेंडी आदि बीयांचे रोपांमध्ये रुपांतर लवकर होते.

४. ज्या बीयांचे रोपात रुपांतर होण्यास अधिक कालावधी लागतो अशा बीया आधी कोमट/थंड पाण्यात भिजवून कोंब आल्यावर काळजीपूर्वक लावल्यास त्या अधिक लवकर आणि चांगल्या रीतीने मूळ धरतात.

५ करंजासारखे बी नुसते टाकून देण्याऐवजी चार बोटे तरी खोल पेरावे, म्हणजे चांगले रुजते. नाही तर त्यांना कावळे खातात.

या पुढील वाटचालीत या अभ्यासपूर्व प्रकल्पातील निष्कर्ष मार्गदर्शक ठरुन संस्था आणि इतर सहभागी कार्यकर्ते त्यांचा निश्चितच उपयोग करतील याची खात्री द्यावीशी वाटते. हे विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि मुलांचे मुद्दाम कौतुक करावयास हवे. हरियालीतर्फे या विद्यार्थ्यांना खास पारितोषिके दिली जाणार आहेत.

सदर पाहाणीत प्रस्तुत लेखकाबरोबरच हरियालीचे कार्यकर्ते प्राचार्य अच्युतराव ओक, नितीन खरे, दत्ताजी सहस्त्रबुध्धे, सुनील चौधरी आदि सहभागी झाले होते.

आता यापुढील वाटचालीत ठाणे - मुंबई परिसरात गोळा करुन पाठविण्यात येणाऱ्या बीयांच्या बरोबरच त्या, त्या ठिकाणच्या शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन अधिकाधिक ताज्या बीया गोळा करण्यावर संस्थेचा भर असणार आहे. तसेच वाटप देखील अधिकाधिक केंद्रांवरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या सहभागातून करीत राहाण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे यंदापासून प्रत्यक्षात वारीत सहभागी होऊन आघाडीवर राहत जागोजागी प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या मार्फत बीयांची प्रत्यक्ष रुजवण देखील केली जाणार आहे. यंदा आषाढी एकादशी रविवार दि. १३ जुलै रोजी असणार आहे. त्याच्या आधीच्या आठवड्यात वारीच्या कार्यकाळात हा प्रत्यक्ष सहभाग कार्यक्रम असणार आहे. त्याआधी पुढचे दोन महिने (एप्रिल आणि मे २००८) या काळात अधिकाधिक वृक्षांच्या बीया गोळा करीत राहाण्यावर संस्थेचा भर असणार आहे. उन्हाळ्याच्या सुटीचा या कामासाठी अधिकाधिक उपयोग विद्यार्थ्यांनी करावा तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील आणि थरातील नागरिकांनी वारीच्या काळात या अनोख्या ईश्वरभक्तीचा अनुभव घ्यावा असे नम्र आवाहन हरियालीतर्फे करण्यास प्रस्तुत लेखकास आनंद होत आहे.

ठाणे,
२८ जानेवारी २००८

पुनम सिंगवी
अध्यक्ष, हरियाली